# <u>प्रेसनोट</u>

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड  जा.क्र.  42/2023  दिनांक : 29.01.2024

## 1)घरफोडी :–

**इस्लापुर :–** दिनांक 26.01.2024 रोजी चे रात्री 00.30 ते सकाळी 07.00 वा. चे दरम्यान, **जलदरा तांडा ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील अज्ञात चोरटयांने बीएसएनएल टावर जवळील ॲक्युमेंट रूमचे लॉक तोडुन आत प्रवेश करून अलकाटेल कंपणीचे बीटीएस मधील टी आर इ कम्बाईनर कार्ड किंमती 7000/–रूपयाचे चोरून नेले. वगैरे **फिर्यादी सुनील दत्तात्रय पाटील, वय 45 वर्षे, व्यवसाय सबडिव्हिजनल इंजिनियर बीएसएनएल कार्यालय किनवट ता. किनवट जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इस्लापुर** गुरनं 09/2024 कलम 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री कांबळे, मो. नं. 9423438305** हे करीत आहेत.

## 2)गंभीर दुखापत :–

**मुदखेड :–**दिनांक 21.01.2024 रोजी चे सकाळी 10.00 वा. चे सुमारास, **मौ. डोणगाव ता. मुदखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करून नालीत पाणी का सोडले या कारणावरून फिर्यादीबाईचे घरा समोर आरडा ओरड करून शिवीगाळ करीत होते. त्यावेळी फिर्यादीबाई म्हणाली की, सरकारी नाली आहे तुम्हाला काय करायचं असे म्हणताच आरोपीतांनी हातातील लाकडाने फिर्यादीचे डावे हाताचे करंगळीजवळ पंजाला जोराने मारून गंभीर दुखापत केली. त्यावेळी फिर्यादीची मुलगी सोनुबाई, नात कांचन, व पती हे आवाज ऐकुन सोडविण्यास आले असता पतीस ढकलुन दिले व मुलगी सोनुबाई हीचे डावे हाताचे पोटरीवर गैरी लाकडाने हातावर मारले. तसेच वेळुचे काठीने तिचे डाव्या हाताचे मनगटावर मारल्याने तिचा हात फॅक्चर केला. व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी पंचफुला भ्र. नंदु बोडके, वय 55 वर्षे, व्यवसाय शेती व घरकाम रा. डोणगाव ता. मुदखेड जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे मुदखेड** गुरन 09/2024 कलम 326, 323, 504, 506, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री शिंदे, मो.नं. 9579613649** हे करीत आहेत.

## 3)अपघात :–

**उस्माननगर :–** दि. 24.01.2024 रोजी चे 18.30 वा. चे सुमारास, **मौ. कापसी खु. येथील दत्त मंदीर समोरील जाणारे मारतळा रोडवर ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे ब्रम्हाजी पांडोजी शिंदे, वय 70 वर्षे रा. वसंतवाडी रोहीपिंपळगाव ता. मुदखेड जि. नांदेड** हे दत्त मंदिराचे समोरून दर्शन करून नातेवाईक आनंदराव ढेपे यांचे घराकडे पायी रस्ता क्रॉस करताना मारतळया वरून नायगावकडे जाणाऱ्या काळया रंगाच्या स्कार्पिओ चालकाने आपले वाहन हयगय व निष्काळजीपणे भरधाव वेगात चालवुन यातील मयतास पाठीमागुन धडक देवुन गंभीर जखमी केले असता त्यांना उपचार कामी सरकारी दवाखाना विष्णुपूरी नांदेड येथे दाखल केले असता डॉक्टरांनी मयत घोषीत केले. त्याचे मरणास स्कार्पिओ चालक कारणीभुत झाला. वगैरे **फिर्यादी बालाजी ब्रम्हाजी शिंदे, वय 39 वर्षे, व्यवसाय शेती रा. रोही पिंपळगाव ता. मुदखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उस्माननगर** गुरनं. 11/2024 कलम 279, 304(अ) भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री केंद्रे, मो.क्र. 9923178909** हे करीत आहेत.

## 4)प्राण्यांना क्रुरतेने वागणुक :–

**मनाठा :–** दिनांक 28.01.2024 रोजी चे 19.00 वा. चे सुमारास, **मनाठा पाटीजवळ ता. हदगांव जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून बिना परवाना बेकायदेशिररीत्या कत्तलीसाठी आयचर टेम्पो क्रमांक एमएच–41/एजी–7349 किंमती 10,000,00/–रू च्या मध्ये भरून 15 म्हशीं किंमती 10,50,000/–रू भरून दाटीवाटी क्रुरतेणे निर्दयपणे वागवुन एकुण किंमती 20,50,000/–रूपयाचे मालासह चोरटी विक्री करण्याकरीता वाहतुक करीत असतांना मिळुन आले. वगैरे **फिर्यादी चापोकॉ/778 अतुल पि. अशोकराव नागरगोजे, ने. पोस्टे मनाठा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मनाठा** गुरन 11/2024 कलम कलम 11(1)(डी) प्रा.नि.वा. प्र. अ. 1960 सह कलम 119 मपोका सह कलम 66/192 मोवाका प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2123 गिरी, मो.क्रं. 9604822123** हे करीत आहेत.

## 5)भारतीय हत्यार कायदा :–

**1)नांदेड ग्रामीण :–**दिनांक 28.01.2024 रोजी चे 03.15 वा. चे सुमारास, **तुपापाटी महाराष्ट्र हॉटेल समोर रोडवर ता. जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकादेशीररीत्या आपले ताब्यात लोखंडी खंजर बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/1991 विक्रम बालाजी वाकडे, ने पोस्टे नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 77/2024 कलम 4/25 भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1238 मुपडे, मो. क्रं. 9823236453** हे करीत आहेत.

**2)नांदेड ग्रामीण :–**दिनांक 28.01.2024 रोजी चे 03.15 वा. चे सुमारास, **विष्णुपूरी ब्रिजखाली सरकारी दवाखाना विष्णुपूर समोर ता. जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकादेशीररीत्या आपले ताब्यात लोखंडी खंजर बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोना/1812 शेख सत्तार शेख मगदुम, ने पोस्टे नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 78/2024 कलम 4/25 भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/124 गवळी, मो.क्रं. 9823236453** हे करीत आहेत.

## 6)प्रोव्हिबीशन :–

**कुंटूर :–** दिनांक 28.01.2024 रोजी चे 16.05 वा. चे सुमारास, **मौजे कोकलेगाव ते नायगाव जाणारे रोडवर मंगेश संभाजी कोटेकर यांचे शेतातील शेडमध्ये ता. नायगांव जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 3600/–रूपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/3380 रणधीर पि. भुजंगसिंग राजबंशी, ने. स्थागुशा, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कुंटूर** गुरनं 14/2024 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1998 कंधारे, मो.नं. 8856080025** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड